## किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२१६/२०१८ मधील नि.६ खालील आदेश
## (पार्वती दिलीप मलमे विरुध्द दिलीप गुंडा मलमे व.२)
## (CNR-MHSN0010452018)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयातील तरतुदीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

### अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे की,

२. अर्जदार हिने केलेल्या मुळ अर्जातील कथने या अर्जकामी पुर्नरावृत्ती टाळणेकामी या अर्जाची कथने समजणेची आहेत. अर्जदार हिने दाखल केलेला मुळ अर्ज गुणाअवगुणांवर चालून न्यायनिर्णयीत होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदार ही निराश्रीत असून तिचा उदरनिर्वाह व औषधोपचार चालविणे अशक्य झालेले आहे. अर्जदार ह्या ब्लड प्रेशर व संधीवात सारख्या दुर्धर आजाराने त्रस्त आहेत. सबब अर्जदारांना उदरनिर्वाहाकरिता व औषधपाण्याकरिता अंतरिम पोटगी मंजूर होणे आवश्यक आहे. अर्जदार हिला औषधपाणी जरुरीचे असून डॉक्टरांनी त्यांना महिन्याला दीड ते दोन हजाराची औषधे घेण्याचा सल्ला दिलेला आहे. तसेच,अर्जदार यांना वारंवार हॉस्पीटलमध्ये उपचाराकरिता दाखल व्हावे लागत असल्याने त्यांना औषधपाणी व वैद्यकीय फी पोटी दरमहा सहा ते सात हजार रुपये खर्च होत आहेत. सबब अर्जदार यांना र.रु.१५,०००/–दरमहा अंतरिम पोटगी होणे न्यायोचित होणार आहे. जाबदार हा मिलीटरीमधून निवृत्त झालेला पेन्शनर असून त्याला दरमहा रु.२५,०००/– पेन्शन मिळते. तसेच, जाबदारकडे गट नंबर ११७ मधील १/३ हिस्सा जमीन (५६ आर) इतकी जमीन असून जाबदारने या गटातील त्याचा निम्मा हिस्सा भाऊ विश्वास यास साठेखताने दिलेला असून त्या जमिनीतून द्राक्षे व ऊसासारखी बागायत पिके घेत आहे व या पिकांपासून रु.४,००,०००/– ते रु.५,००,०००/– दरवर्षी उत्पन्न घेत आहे. जाबदार हा पॅनकार्ड क्लब लि. कंपनी विटा या कंपनीचा एजंट असून त्याला वर्षाला रु.१,००,०००/– ते रु.२,००,०००/– कमिशन मिळते. जाबदार क्र.१ कडे स्वतःची मारुती इको कार आहे. अशाप्रकारे जाबदार हा अति सधन असून त्याचेवर कोणीही अवलंबून नाही. त्यामुळे त्याची रु.१५,०००/– अंतरिम पोटगी देण्याची ऐपत आहे. अर्जदारला जाबदार क्र.१ कडून औषधपाणी, भरणपोषण वगैरेकरिता दरमहा रु.१५,०००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून मिळावी. अर्जदार हिने नि.११ कडे अर्ज देवून अंतरिम पोटगीची रक्कम जाबदार क्र.१ चे स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा–तासगाव येथील अकौंट नंबर–११३१५६१६३६४ मधून न्यायालयात जमा करणेबाबत संबंधित बँकेस आदेश करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास जाबदार क्र.१ यांनी नि.१९ कडे आपले म्हणणे देवून जोरदार विरोध दर्शविला आहे. जाबदार क्र.१ चे कथनाप्रमाणे, जाबदार क्र.१ हा जाबदार क्र.२ यांच्या सांगण्यावरुन

अर्जदारला कधीही मारहाण करत नव्हता. मुळातच जाबदार क्र.१ व जाबदार क्र.२ यांचे कोणत्याही प्रकारचे संगनमत नव्हते. जाबदार यांनी त्यांचे भावाची जमीन कधीही साठेखत करुन घेतलेली नव्हती. त्यामुळे त्यामधून उत्पन्न घेणेचा संबंधच येत नाही. जाबदाराने अर्जदार हिला अर्जातील कलम २ मधील कथनांप्रमाणे कधीही त्रास दिलेला नाही. जाबदार यांना दारुचे व्यसन नाही. अर्जदार कधीही तिचे बहिणीकडे गेलेली नव्हती व तिने लक्ष्मीहार गहाण ठेवलेला नाही. अर्जदार हिने जाबदारास अर्जात कथन केल्याप्रमाणे उत्पन्न असल्याचे शाबित करणे आवश्यक आहे. अर्जदार ही सुखवस्तु असून तिला कोणताही आजार नाही. अर्जदार ही दोन्ही मुलांकडे सुखाने राहत आहे. अर्जदार व जाबदारचा एक मुलगा सांगली पोलीस खात्यात नोकरीस असून त्याला भरपूर पगार आहे ,तो अर्जदार हिचा सांभाळ करीत आहे. अर्जदार ही स्वभावाने हट्टी असून तिचे म्हणणेप्रमाणे वागले नाही की, जाबदारास वरचेवर मानसिक त्रास देत असते. जाबदाराने मुलांना नोकरी लावून दिली आहे. जाबदार हे कोणत्याही कंपनीत एजंट काम करीत नाही. जाबदार यांना अर्जदारने कथन केलेप्रमाणे उत्पन्न मिळत नाही. जाबदारने अर्जदारला कधीही मारहाण केलेली नाही. जाबदार क्र.१ अर्जदार हिला नांदविणेस तयार आहे.

४. अर्जदारसोबत प्रदिप व प्रविण हि मुले राहतात. प्रदिप थोरला असून त्याचे लग्न झालेले आहे. तो दारुचे व्यसनाधिन झालेने त्याचे पत्नीला म्हणजेच जाबदार क्र.२ यांना नांदवित नाही. जाबदार यांनी त्यांची शेतमिळकत प्रदिप, प्रविण व अर्जदार यांना कसून खाणेस दिलेली आहे. सदर जमिनीत अर्जदार ही तिच्या मुलाच्या मदतीने गहु, ज्वारी , भाजीपाला यासारखी पिके घेत आहे. त्यातून महिनाकाठी १० ते २० हजार रुपये मिळतात. जाबदार क्र.१ याने प्रदिप यास सन २०१६ मध्ये म्हैस घेवून दिलेली होती ती म्हैस विकून त्याने २ जरसी गायी घेतलेल्या आहेत. त्यातून दुधाचे महिनाकाठी १० हजार रुपये मिळतात. अशाप्रकारे प्रविण यास महिन्याकाठी २५ ते ३० हजार रुपये तसेच शेतीतून प्रदिप यास २० हजार रुपये असे एकूण ६० हजार रुपये उत्पन्न अर्जदार हिला मिळते. ती स्वतःचा उदरनिर्वाह करणेस सक्षम आहे. जाबदार यास मिलीटरीची तुटपुंजी पेन्शन आहे. त्यातून तो कशीबशी गुजरान करीत आहे.

५. सुनंदा शिवाजी आडके ही तथाकथित बाईबरोबर जाबदार याचे विवाहबाह्य संबंध आहेत व ती बाई जाबदारचे शेतातील घरात राहते हि विधाने खोटी आहेत. जाबदार त्याने स्वतः खरेदी घेतलेल्या स्वकष्टार्जित मिळकतीत मौजे नागांव निमणी या गावठाण हद्दीत ४० x ६० चे प्लॉटमध्ये पत्राविटाचे घरात राहत आहेत. अर्जदार हिला कसलाही आजार नसून तिला देवर्षीपणाचा नाद असून अंधश्रध्दा करणेस आवडते व प्रसंगी दागिने विकून, उसने पैसे आणून खर्च करीत असते, देवर्षी याने सांगेल तसा अवाढव्य खर्च करते. जाबदारचा मुलगा प्रविण सन २०१२–२०१३ मध्ये पोलीस खात्यात नोकरीस लागला आहे व त्याची बायको सुध्दा पोलीस खात्यातच आहे. दोघांना मिळून ५० ते ६० हजार रुपये पगार मिळतो. मुलगा प्रविणदेखील अर्जदार हिची देखभाल,सांभाळ करत आहे. तसेच, प्रदिप याला खाण्यासाठी २८ गुंठे जमिन दिली आहे. तो शेतीतील मजुरीची कामे करुन पैसे मिळवून अर्जदार हिला देतो. प्रदिप यास दारुचे व्यसन असल्यामुळे त्याची पत्नी त्याचेबरोबर नांदत नाही. अर्जदार हीच त्याला स्वयंपाक करुन घालते.

जाबदार याने मुलगा प्रदिपचा संसार चांगला व्हावा म्हणून त्याची बायको सानिका व तिचे वडिलांना वेळोवेळी समजुती घालून तिला नांदवणेचा प्रयत्न केलेला आहे.

६. जाबदार क्र.१ हे वेळोवेळी मुले प्रविण व प्रदिप याचे भविष्याकरिता खर्च करतात. प्रविणच्या नोकरीसाठी जाबदार याने कर्ज घेतले होते. प्रदिपच्या पत्नीस नांदणेस आणणेचा प्रयत्न करत आहेत. ३० गुंठे जमीन कसण्यास दिली असून ऊस पीक आहे व केवळ भांडण नको म्हणून जाबदार शेतातील खोलीत राहतात, हाताने करुन खातात किंवा भावाचे घरी जेवतात. अर्थातच अर्जदार जाबदार यास त्याचे स्वतःचे घरात त्रास देत आहे. जाबदार यांना सांधेदुखी व साखरेचा त्रास असून त्याचा खर्च जाबदार स्वतः करतात. पॅनकार्ड क्लब इंडिया या कंपनीवर कारवाई केल्यामुळे सदर कंपनी सन २०१४ साली बंद असल्यामुळे जाबदार यांना कसलाही फायदा व उत्पन्न मिळत नाही. उलट जाबदार यांनी ८९ लोकांचे कंपनीकडे जवळ जवळ १५ लाख रुपये गुंतविलेले आहेत. त्यापैकी कोणाचाही परतावा कंपनीने दिलेला नसल्यामुळे ते सर्व लोक जाबदार क्र.१ कडे पैशाची मागणी करु लागले आहेत. त्यामुळे जाबदार यांना भरपूर कर्जे झालेली आहेत. मुलांच्या लग्नासाठी जाबदार यांनी विकास सोसायटीचे रु.१,५०,०००/-चे कर्ज काढलेले होते त्यातून वेळोवेळी पैसे खर्च केलेले आहेत. सबब अर्जदार हिचा पोटगी मिळणेचा अर्ज नामंजूर व्हावा. अर्जदारचे समुपदेशन व्हावे व मध्यस्थामार्फत तडजोडीचे प्रयत्न होवून, जाबदार यांना निमणी गावठाणातील घरात राहणेस घेणेबाबत आदेश व्हावा.

७. अर्जदार आणि जाबदार यांच्यातील कथनांचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | नि.६ व नि.११ कडील अर्जात मागणी केलेप्रमाणे अर्जदार अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय, असल्यास रक्कम किती ? | अंशतः होकारार्थी |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

८. अर्ज व म्हणण्यातील कथने वाचली. अभिलेख पाहिला. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ शपथपत्र दाखल केलेले आहे. तसेच, नि.४ व १०, २२ सोबत कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञांनी त्यांचे अर्ज व म्हणणेतील कथने व कागदपत्रे यांना अनुसरुन युक्तिवाद केला.

## :: कारणमिमांसा ::

### मुद्दे क्र.१ व २ करीता –

९. अर्जदार व जाबदार क्र.१ हे पती–पत्नी आहेत व त्यांना प्रविण व प्रदीप अशी सज्ञान मुले

आहेत. जाबदार क्र.३ मुलगा प्रदीप याची पत्नी आहे याबाबत वाद नाही. अर्जदार हिने अर्जात कथन केलेप्रमाणे जाबदार यांनी तिला शारीरीक व मानसिक त्रास देवून कौटुंबिक छळ केला हे सखोल पुराव्याने शाबित करणे आवश्यक आहे.

१०. अर्जदार हिचा अर्ज व जाबदार यांचे म्हणणेमधून अर्जदार ही नागाव निमणी येथे राहणेस जाबदार क्र.१ याने पती या नात्याने तिचा उदरनिर्वाह, औषधोपचार इ. बाबत कोणतीही व्यवस्था केलेचे दिसून येत नाही. अर्जदार हिने जाबदार हा मिलीटरीमधून निवृत्त झालेला पेन्शनर असून त्याला दरमहा रु.२५,०००/- पेन्शन मिळते.तसेच गट नंबर ११७ मधील त्याचे जमिनीतून तो द्राक्षे व ऊसासारखी बागायत पिके घेत असून त्यातून रु.४,००,०००/- ते रु.५,००,०००/- दरवर्षी उत्पन्न घेत असतो. जाबदार हा पॅनकार्ड क्लब लि. कंपनी विटा या कंपनीचा एजंट असून त्याला वर्षाला रु.१,००,०००/- ते रु.२,००,०००/- कमिशन मिळते अशी कथने केलेली आहेत. अर्जदार हिने १०/१ कडे स्टेट बँक ऑफ इंडिया,शाखा तासगाव येथील जाबदाराचे खात्याचा दि.३०.१०.२०१८ रोजीचा खातेउतारा दाखल केलेला असून त्यामध्ये जाबदारास दि.२९.१०.२०१८ रोजी र.रु.२०,०८६/- इतकी रक्कम पेन्शन म्हणून मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच नि.१०/२ कडील सातबारा उता-याचे अवलोकन केले असता, गट नं. ११७ पैकी ५६ आर क्षेत्र जाबदाराचे नावे नोंद असल्याचे दिसून येते. परंतु केवळ या सातबारा उता-यावरुन,जाबदार क्र.१ यास या जमीनीतून वादीस दरसाल द्राक्षे व ऊसासारखी बागायत पिकांतून रक्कम रु.४,००,०००/- ते रु.५,००,०००/- उत्पन्न मिळत असल्याचे अनुमान काढता येणार नाही. सबब अर्जदार हिने शेतीमधून व कमिशन एंजट म्हणून जाबदारास उत्पन्न मिळते हे शाबित होणेकरिता सखोल पुरावा देणे आवश्यक आहे. तथापि बँकेचे खातेउता-यावरुन जाबदार क्र.१ यास उत्पन्नाचे साधन असून त्याची अर्जदार क्र.१ हिला दरमहा विशिष्ट रक्कम पोटगी म्हणून देणेची ऐपत असल्याचे स्पष्ट होते.

११. जाबदार क्र.१ ने अर्जदार हिचे पोटगीची व्यवस्था केलेबाबत कथन केलेले नाही अगर तसा पुरावा दाखल केलेला नाही. केवळ नांदवणेस तयार आहे व मुलांना स्वतंत्ररित्या उत्पन्न मिळत असून ती अर्जदार हिला सांभाळणेस समर्थ आहेत असे कथन करुन जाबदार क्र.१ यास अर्जदार हिची पालनपोषणाची जबाबदारी टाळता येणार नाही. ती शारिरीक दृष्टया सक्षम आहे असे जाबदार यांचे कथन असले तरीही अर्जदार हिने नि.२२/१ ते १० कडे तिचेवर करणेत आलेल्या वैदयकीय उपचार व औषधांची यादया दाखल केलेल्या आहेत. परंतु अर्जदार हिने ती आजारी असल्याचे स्वतंत्र पुराव्याने शाबित करणे आवश्यक आहे. जाबदारने त्याच्या म्हणणेमध्ये अर्जदार ही मुलांजवळ असून तिला मुले सांभाळत असलेची कथने केलेली आहेत. त्यामुळे सदर कामी अर्जदार हिला स्वतंत्र उत्पन्न असलेचे दिसून येत नाही. यावरुन जाबदार याचेवर अर्जदार हिला सांभाळणेची व पालनपोषणाची असलेली कायदेशीर व नैतिक जबाबदारी जाबदार क्र.१ पार पाडत नसल्याचे व त्यामुळे अर्जदार यांना अंतरिम पोटगी मागणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.

१२. वरील विवेचनावरुन जाबदार क्र.१ यास पेन्शनव्दारे उत्पन्न मिळत असताना अर्जदार क्र.१ हिचे उदरनिर्वाह, कपडेलत्ते इ. कोणतीही सोय केली नसल्याने जाबदार सक्षम असूनही अर्जदार यांचेकडे दुर्लक्ष करीत असून अर्जदार हिचे पालनपोषणाची जबाबदारी टाळत असलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार क्र.१ हि पत्नी या नात्याने पुर्णतः जाबदार क्र. १ वर अवलंबून आहे. पत्नीचा सांभाळ करणेची जाबदार याची पती नात्याने नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. सबब, जाबदार क्र.१ याचे म्हणणेप्रमाणे त्याला मिळत असलेले उत्पन्न पाहता, अर्जदार क्र.१ हिचे वय व तिच्या मूलभूत गरजा भागविणेकरिता येणा–या खर्चाची आवश्यकता पाहता, जाबदार क्र.१ याची अर्जदार हिला दरमहा अनुक्रमे र.रु.५,०००/– अंतरिम पोटगी देण्याची ऐपत असलेने तसा आदेश करणे योग्य व समर्पक ठरणार आहे. नि.११ प्रमाणे केलेली मागणी मुळ अर्जाचे न्यायनिर्णयावेळी मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करणेच्या निष्कर्षास मी आले आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

## **<u>आदेश</u>**

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. जाबदार क्र.१ याने अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाचे निकालापर्यंत अंतरिम पोटगी म्हणून दरमहा र.रु.५,०००/– देणेची आहे.

३. प्रस्तुत अर्जाच्या खर्चाची रक्कम मूळ अर्जाचे कामी समाविष्ट करण्यात यावी.

स्वाक्षरी/–
(श्रीमती एस.एस. मांजरेकर)
प्रभारी २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, **तासगांव.**

**तासगांव.**
दि.०५.०४.२०१९